**पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई**

**प्रसिद्धीपत्रक**

दिनांक : 22 ऑगस्ट 2026

---

# नशामुक्त नवी मुंबईच्या दिशेने निर्णायक पाऊल

## मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'कॅम्पस कनेक्ट'चा शुभारंभ

### विमानतळ पोलीस स्टेशन, सीसीटीव्ही कमांड सेंटर व व्यसनमुक्ती केंद्राचेही उद्घाटन

नवी मुंबई, दि. 22 : शाळा-महाविद्यालयांतील तरुण पिढी अंमली पदार्थांच्या आहारी जाऊ नये यासाठी नवी मुंबई पोलिसांनी हाती घेतलेल्या 'कॅम्पस कनेक्ट' उपक्रमाचा शुभारंभ मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते आज डी. वाय. पाटील महाविद्यालय, नवी मुंबई येथे झाला. याच कार्यक्रमात नवी मुंबई विमानतळ पोलीस स्टेशन, एकात्मिक सीसीटीव्ही कमांड सेंटर आणि व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र यांचे उद्घाटनही मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यंमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.श्री.गणेशजी नाईक, वनमंत्री, मा. श्री.भरत गोगावले, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री, श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्यासह, मा. आमदार, महापौर, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'नशामुक्त नवी मुंबई' हे अभियान जानेवारी 2025 मध्ये मुख्यमंत्री महोदयांच्याच हस्ते सुरू करण्यात आले होते. नागरिकांना अंमली पदार्थांविषयी निर्भीडपणे माहिती देता यावी यासाठी 8828 112 112 हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या ड्रग्जविरोधातील 'झिरो टॉलरन्स' धोरणानुसार नवी मुंबई पोलिसांनी मागील 03 वर्षात 2919 आरोपींना अटक करून 1027 किलो वजनाचे व 142 कोटी रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. 1822 सेवन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई, तर 300 सराईत आरोपींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

अंमली पदार्थांविरोधातील कारवाईला धार देण्यासाठी श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र 'अँटी नार्कोटिक्स सेल' स्थापन केला. राज्यात असा प्रयोग करणारे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय पहिलेच ठरले असून, त्यामुळे स्थानिक पातळीवरच अंमली पदार्थांच्या साखळीवर लक्ष ठेवून तातडीने कारवाई करणे शक्य झाले. या यशाची दखल घेऊन शासनाने पुढे राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अँटी नार्कोटिक्स सेल स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

याच काळात आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजाचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यात आले. 'ऑपरेशन गरुड' व 'ऑपरेशन प्रहार' या मोहिमांतून 250 परदेशी नागरिकांना अटक करण्यात आली, तर 2211 जणांना मायदेशी परत पाठविण्यात आले. परिणामी अंमली पदार्थांचे विक्रेते आता नवी मुंबईकडे फिरकण्यास धजावत नाहीत.

'कॅम्पस कनेक्ट' ला नवी मुंबईतील जवळपास 250 महाविद्यालयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या 'पोस्टर मेकिंग' व 'रील मेकिंग' स्पर्धांतील प्रथम तीन विजेत्यांचा मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात तीन प्राचार्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या पत्राचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाद्वारे प्रत्येक शाळा व महाविद्यालयात 'अँटी-नार्कोटिक्स कमिटी' स्थापन करण्यात येणार असून, त्यात शाळा-महाविद्यालयाचे प्रतिनिधी व पोलीस विभागाचा एक प्रतिनिधी

असेल. आवारात व परिसरात अंमली  पदार्थांची विक्री होणार नाही याकडे ही समिती लक्ष देईल आणि विद्यार्थ्यांचे नियमित प्रबोधन करेल.

नवी मुंबई पोलीस व नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त पुढाकारातून सुरू होत असलेल्या व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रात वैद्यकीय तपासणी, मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन, औषधोपचार व समुपदेशनासह 10 खाटांची निवासी उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. व्यसनमुक्ती ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसल्याने मानसिक आधार व पुनर्वसनावर विशेष भर देण्यात येणार असून, व्यसनाधीन व्यक्तीचा आत्मविश्वास पुनर्स्थापित करून तिला सन्मानाने समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे केंद्राचे उद्दिष्ट आहे. अंमली पदार्थांविरोधातील लढ्यात प्रतिबंध, उपचार व पुनर्वसन यांना जोडणारा दुवा म्हणून हे केंद्र काम करणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका व तळोजा एमआयडीसी क्षेत्रांतील 4011 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फीड आता पोलीस आयुक्त कार्यालयातील एकात्मिक सीसीटीव्ही कमांड सेंटरमध्ये 'लाइव्ह' तसेच 'बॅकअप' सह एकाच ठिकाणी पाहता येणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुन्हेगारांचा शोध घेणे व गुन्ह्यांची उकल जलद करणे यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार असून भविष्यात आणखी कॅमेरे त्याच्याशी जोडण्यात येणार आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे परिसरातील नागरिक, प्रवासी व व्यावसायिक हालचालींमध्ये मोठी वाढ अपेक्षित असल्याने स्वतंत्र 'नवी मुंबई विमानतळ पोलीस स्टेशन' कार्यान्वित करण्यात आले आहे. या पोलीस स्टेशनसाठी 1 वरिष्ठ पोलीस निरीक्षक, 6 सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक व 40 अंमलदार असे मनुष्यबळ देण्यात आले असून, सिडको व अदानी समूहाच्या सहकार्याने आधुनिक कॉन्फरन्स रुम तसेच सहायक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष असलेली सुसज्ज इमारत उभारण्यात आली आहे. प्रवाशांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि तत्पर पोलीस प्रतिसाद यासाठी हे पोलीस स्टेशन महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

सदर ' कॅम्पस कनेक्ट ' कार्यक्रमामध्ये हजारो विदयार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग नोंदविला. या कार्यक्रमामध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी उपस्थित सर्व विदयार्थ्यांना नशामुक्त जीवन जगण्याची शपथ दिली.

अंमली  पदार्थांची विक्री अथवा सेवन याबाबत कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी 8828 112 112 या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबई पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

(जनसंपर्क अधिकारी)
पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई.